| | |
|---|---|
| दाखल तारीख | १०/०२/२०२५ |
| नोंदणी तारीख | १०/०२/२०२५ |
| निर्णय तारीख | ३१/०३/२०२६ |
| कालावधी | ०१ व., ०१ म., दि.२१ |
| **CNR No. MHGA050000922025** | |

भाग – अ

(न्यायनिर्णयाची शीर्षक पान)

[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (१)]

निशाणी क्र.०७ खाली...

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, देसाईगंज यांचे न्यायालयात.**

(पिठासीन अधिकारी – सतिश गो. गोरे)

| | |
|---|---|
| अपराध क्रमांक व पोलीस स्टेशनचा तपशील | **अपराध क्र. ४६२/२०२३,**<br>पोलीस स्टेशन, देसाईगंज. |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ३१/०३/२०२६ |
| प्रकरण क्रमांक | **संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ५३/२०२५** |
| अभियोग पक्ष : | **महाराष्ट्र शासन** तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी,<br>देसाईगंज, ता. देसाईगंज, जि. गडचिरोली.<br>(दिनेश रेवनाथ राऊत, पो.शि. ब.नं.२९७३) |
| अभियोग पक्षातर्फे अधिवक्ता | **श्री.आर.डब्ल्यु सकिनलावार,**<br>विशेष सहा. सरकारी अभियोक्ता |
| आरोपी : | **१. संजय शालीकराम ठाकरे,**<br>वय –४२ वर्ष, धंदा – मजुरी,<br>रा. कुरूड.<br>ता. देसाईगंज, जि. गडचिरोली.<br>**२. रोशन मोतीराम भैसारे,**<br>वय –३२ वर्ष, धंदा – मजुरी, |

| | |
|---|---|
| | रा. कमलानगर, देसाईगंज.<br>ता. देसाईगंज, जि. गडचिरोली. |
| **आरोपीतर्फे अधिवक्ता :** | **श्री. एस.एस.गुरू.** |

**भाग – ब**

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (२)]**

| | |
|---|---|
| घटनेचा दिनांक : | २६/१०/२०२३ |
| एफ.आय.आर. दिनांक : | २६/१०/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक : | १०/०२/२०२५ |
| गुन्ह्याचा तपशील निश्चितीचा दिनांक : | १०/०२/२०२५ |
| पुराव्यास सुरुवात झाल्याचा दिनांक : | १५/०५/२०२५ |
| निकालाकरिता ठेवल्याचा दिनांक : | १२/०३/२०२६ |
| निकाल दिनांक : | ३१/०३/२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास तो दिनांक : | --- |

**आरोपीचा तपशील**

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामिन तारीख | दोषारोप /आरोप | दोषी / निर्दोष | शिक्षा | तुरुंगामध्ये न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संजय शालीकराम ठाकरे | --- | १०/०२/२०२५ | १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा सह कलम १०९ भा.दं.वि. | निर्दोष | नाही | नाही |
| २. | रोशन मोतीराम भैसारे | | | | | | |

**भाग – क**

**फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (३)]**

**अभियोग पक्ष/ बचाव पक्ष / न्यायालयाने बोलाविलेल्या साक्षदारांची यादी**

| क्र. | नाव | साक्षदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | फिरोज नामदेव खोब्रागडे (**नि.क्र.०७ खाली**) | पंच साक्षदार |
| अ.सा.क्र.२ | अविनाश घनश्याम घुटके (**नि.क्र.०७ खाली**) | पंच साक्षदार |

बचावपक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षदारांची यादी

| अ.क्र. | नाव | साक्षेचे स्वरुप |
|---|---|---|
| ब.सा.क्र. १ | निरंक | निरंक |

न्यायालयातर्फे नोंदविलेल्या साक्षदारांची यादी

| अ. क्र. | नाव | साक्षेचे स्वरुप |
|---|---|---|
| न्या.सा.क्र. १ | निरंक | निरंक |

सरकार पक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

बचावपक्षातर्फे मान्य केलेल्या कागदपत्राची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

बचावपक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

न्यायालयातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्राची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

मेटरीअल ऑब्जेक्ट/महत्त्वाच्या वस्तू

| अ. क्र. | मटेरिअल ऑब्जेक्ट /महत्त्वाच्या वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## :: न्यायनिर्णय ::

(जाहिर दिनांक ३१/०३/२०२६)

आरोपीविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदाचे कलम १२(अ) अंतर्गत दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. अभियोग पक्षाचे कथन, अभिलेखावरील कागदोपत्री पुरावा लक्षात घेता खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात, त्यांचे कारणांसह निष्कर्ष मी

खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष सिद्ध करतो काय की, दि. २६/१०/२०२३ ला १६:३० ते १७:१५ वाजताच्या दरम्यान मौजा कुरूड, ता. देसाईगंज, जिल्हा गडचिरोली येथे आरोपी क्र.१ आरोपी क्र.२ च्या सांगण्यानुसार सार्वजनीक ठिकाणी सट्टापट्टीचे आकडे लिहुन जुगार खेळताना मिळून आला ? | **...नाही** |
| २. | आदेश काय ? | **...अंतीम आदेशानुसार** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र. १ करीता</u>** :–

**२.** आरोपीवर ठेवलेला दोषारोप सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षाने फिरोज नामदेव खोब्रागडे **(अ.सा.क्र.१)** व अविनाश घनश्याम घुटके **(अ.सा.क्र.२)** यांना तपासले. अभियोग पक्षातर्फे पुरसीस **(नि.क्र.८)** दाखल करून सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीविरूध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर आला नसल्यामुळे त्याचा भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ३५१(१)(ब) अन्वयेचा जवाब वगळण्यात आला.

**३.** फिरोज **(अ.सा.क्र.१)** व अविनाश **(अ.सा.क्र.२)** हे घटनास्थळ कम जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षदार असुन, त्यांच्या साक्षेत असे आले आहे की, ते आरोपींना ओळखत नाही. पोलिसांनी त्यांना पंचनामा करण्यासाठी कोठेही बोलाविले नव्हते व त्यांच्या

समक्ष कोणतीही कारवाई करण्यात आलेली नव्हती. त्यांनी घटनास्थळ कम जप्ती पंचनाम्यावर त्यांची सह्या असल्याचे सांगितले तसेच त्यातील मजकूराबाबत अनभिन्नता दर्शविली. सदर साक्षदारांना उलटतपासात विचारण्यात जाणारे उत्तर सुचक प्रश्न अभियोग पक्षाद्वारे विचारले असता त्यामध्येही त्यांनी दि.२६/१०/२०२३ ला मौजा कुरूड येथे सार्वजनिक ठिकाणी पोलीसांनी त्यांना पंचनामा करण्याकरिता बोलाविले होते, त्या ठिकाणी आरोपी क्र.१ हा आरोपी क्र.२ च्या सांगण्यानुसार सट्टापट्टीचे आकडे लिहुन जुगार खेळतांना मिळुन आला होता व त्याच्या अंगझडतीत रोख रक्कम रू. २,०००/–, आकडे लिहिलेला कागद व एक पेन जप्त केले होते व त्याबाबतचा घटनास्थळ कम जप्ती पंचनामा तयार केला होता व त्यावर त्यांनी सह्या केल्या होत्या, हे सर्व कथन नाकारले.

४. वरील साक्षदाराव्यतिरिक्त अभियोग पक्षाने इतर कोणताही साक्षदार तपासला नाही. अभियोग पक्षाला वारंवार संधी देवून सुद्धा अभियोग पक्ष इतर साक्षदाराला हजर करु शकला नाही. पंच साक्षदाराने अभियोग पक्षाला पाठींबा दिलेला नाही. फिर्यादीची साक्ष न नोंदविल्यामुळे अभियोग पक्ष फिर्याद व त्यामधील मजकुर तसेच घटनास्थळ कम जप्ती पंचनामा सिद्ध करु शकला नाही. एकंदरीत अभिलेखावर आरोपी क्र.१ घटनेच्या दिवशी आरोपी क्र.२ च्या सांगण्यानुसार सट्टापटीचा जुगार खेळताना सार्वजनिक ठिकाणी मिळून आला होता, असा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी असे देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u> :–**

**५.** मुद्दा क्र. १ च्या नकारार्थी निष्कर्षास अनुसरुन आरोपी निर्दोष सुटण्यास पात्र आहे. जप्त मुद्देमाल एकूण रोख रक्कम रु. २,०००/– करीता कोणीही दावा न केल्यामुळे अपील कालावधीनंतर ती रक्कम सरकार खात्यात जमा करणे योग्य होईल. इतर जप्त मुद्देमाल आकडे लिहिलेला कागद, कार्बन व एक पेन मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधीनंतर तो नष्ट करणे योग्य होईल. आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८१(१) ची पुर्तता आधीच केलेली आहे. म्हणून मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** आरोपींना महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायद्याचे कलम १२(अ) नुसार शिक्षेस पात्र असलेल्या अपराधातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७८(१) प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येते.

**२.** आरोपीचा जात मुचलका व बंधपत्र रद्द करण्यात येते.

**३.** जप्त रोख रक्कम रु.२,०००/–अपील कालावधीनंतर सरकार खात्यात जमा करण्यात यावी.

**४.** जप्त मुद्देमाल आकडे लिहिलेला कागद, कार्बन व एक पेन मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधीनंतर तो नष्ट करण्यात यावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SATISH GOPALRAO GORE
Date: 2026.03.31 17:05:10 +0530

दिनांक :३१/०३/२०२६.

**(सतिश गोपालराव गोरे)**

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, देसाईगंज

JO CODE- MH02902